POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४६ ● मुंबई, गुरुवार, ०९ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नाशिकमध्ये नामांकित कंपनीत तरुणींचा धर्मांतरासाठी छळ

# नमाज आणि बीफ खाण्याचा दबाव

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक


मंदिरांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी एक घटना उघडकीस आली आहे. एका प्रसिद्ध बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या तरुणींना अत्यंत भयानक अनुभवांना सामोरे जावे लागल्याचे समोर आले आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या आणि नोकरीची नितांत गरज असलेल्या गरजू महिलांचा गैरफायदा घेत, त्यांच्यावर केवळ लैंगिक अत्याचारच करण्यात आले नाहीत, तर त्यांच्या धार्मिक भावनांनाही जाणीवपूर्वक ठेच पोहचवण्यात आली आहे. या संतापजनक प्रकारामुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत असून, पीडित महिलांना देण्यात आलेल्या या 'नरकयातनां'ची तक्रार प्राप्त होताच प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी प्रशासनाने आता पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. एका नामांकित कंपनीच्या आवारात घडलेल्या या प्रकारामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**धर्मांतराचा दबाव आणि अघोरी छळ**

येथील एका नामांकित कंपनीत गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या महिलांच्या शोषणाचे धक्कादायक वास्तव आता समोर आले आहे. प्रामुख्याने १८ ते २५ वयोगटातील तरुण आणि गरजू महिलांना लक्ष करून त्यांचे मानसिक व शारीरिक खच्चीकरण केले जात असल्याचे उघड झाले आहे. आर्थिक ओढग्रस्ततेमुळे नोकरीची गरज असलेल्या या तरुणींचा फायदा घेत, २०२२ पासून हा अमानवीय प्रकार सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. केवळ कामाच्या ठिकाणचे शोषणच नव्हे, तर या तरुणींवर विशिष्ट धार्मिक कृत्ये करण्यासाठी सक्ती केली जात होती. यामध्ये नमाज पठणाची सक्ती, धर्मांतरासाठी दबाव आणणे आणि इतकेच नव्हे तर आहारविषयक धार्मिक भावना पायदळी तुडवत 'बीफ' खाण्यास भाग पाडणे अशा संतापजनक प्रकारांचा समावेश आहे. सुरक्षित वातावरणाऐवजी नरकयातना देणाऱ्या या कंपनी प्रशासनाविरोधात आता संतापाची लाट उसळली असून, या 'धार्मिक आणि शारीरिक' छळाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**सहा नराधमांना बेड्या, नऊ गुन्हे दाखल...**

या धक्कादायक घटनेत आतापर्यंत नऊ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांनी सहा मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये मुंबई नाका पोलीस ठाण्यात विनयभंग, धार्मिक भावना दुखावणे आणि अत्याचाराचे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, तर देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात आसिफ अन्सारी, शफी शेख, शाहरुख कुरेशी, रजा मेमन आणि तौसिफ अत्तार या पाच पुरुष आरोपींसह एका साथिदाराला अटक केली आहे. या टोळीतील एक महिला आरोपी सध्या पोलिसांना गुंगारा देत असून तिचा शोध सुरू आहे. अटक केलेल्या सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या कारवाईमुळे पीडित महिलांना न्याय मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या असून, पोलीस या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाण्यासाठी कसून तपास करत आहेत.




**तपासासाठी 'एसआयटी' तैनात**

प्रसिद्ध बहुराष्ट्रीय कंपनीतील अमानवीय छळ आणि धार्मिक शोषणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक पोलिसांनी आता 'विशेष तपास पथकाची' स्थापना केली आहे. सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली हे पथक या प्रकरणाच्या मुळाशी जाणार आहे. तपासादरम्यान केवळ महिलाच नाही, तर एका पुरुष कर्मचाऱ्यालाही जबरदस्तीने धर्मांतर करण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्याने या रॅकेटची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेचे पडसाद उमटल्यानंतर प्रशासनाने शहरातील सर्व खासगी कंपन्यांना कडक निर्देश दिले आहेत. प्रत्येक कंपनीत 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' तात्काळ सक्रिय करणे अनिवार्य करण्यात आले आहे. दरम्यान, पोलीस प्रशासनाने पीडित महिलांना न घाबरता पुढे येण्याचे आवाहन केले आहे. तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी ग्वाही स्वतः पोलीस आयुक्तांनी दिली आहे. कोणत्याही पीडित महिलेला तक्रार करायची असल्यास त्यांनी पोलीस आयुक्तांच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर किंवा 112 या कंट्रोल रूम क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस आयुक्तांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घातले असून, पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस दल कटीबद्ध असल्याचे सांगितले आहे.

## जिल्हयांमध्ये 8 ते 14 एप्रिल दरम्यान 'सामाजिक समता सप्ताह' साजरा होणार

# विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ठाणे। प्रतिनिधी,

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे संपूर्ण राज्यात 8 एप्रिल ते 14 एप्रिल 2026 या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आणि महामानवांच्या विचारांचा जागर करणे हा मुख्य उद्देश आहे.

या सात दिवसांत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 8 एप्रिलः सप्ताहाचे उद्घाटन आणि प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतीचे वाटप केले जाईल, 9 व 10 एप्रिलः शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर व्याख्याने, निबंध आणि वकृत्व स्पर्धा घेतल्या जातील.

तसेच 'चवदार तळे सत्याग्रह' शताब्दी वर्षानिमित्त मानवी हक्कांवर विशेष कार्यक्रम होतील, 11 एप्रिलः महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील, 12 एप्रिलः 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल. तसेच महिलांसाठी विशेष मेळावे आयोजित करून डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या प्रगतीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली जाईल, 13 एप्रिलः ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे, आरोग्य विभागाच्या मदतीने रक्तदान शिबिरे आणि विविध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबवले जाईल.

या दिवशी जिल्हा जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाईन वैधता प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात येईल, 14 एप्रिलः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांना अभिवादन करून सप्ताहाचा समारोप होईल. यावेळी शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्यावर विशेष व्याख्याने आयोजित केली जातील.

जिल्हास्तरावर सामाजिक कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त या सर्व कार्यक्रमांची जबाबदारी सांभाळणार असून ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

## पुढच्या 48 तासांत राज्यावर नवं संकट

■मुंबई। प्रतिनिधी,

गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे संकट आले. या अवकाळी पावसामुळे शहरी भागात लोकांना उन्हाच्या झळांमध्ये गारव्याचा आनंद लुटता आला. परंतु ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. द्राक्षे, कांदा, आंबा आदी पिकांची नासधूस झाली. दरम्यान, आता हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील 48 तास खूप महत्त्वाचे असणार आहेत. अवकाळी पावसानंतर आता राज्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. मुंबईसह कोकण किनारपट्टीत तापमानात 2 ते 3 टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच पुणे, सोलापूर आणि राज्यातील इतर भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. या भागात हवामान 32 ते 38 अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. मार्च महिन्याच्या सुरवातीला अवकाळी पावसानंतर आता विदर्भातही तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात तापमान 41 ते 42 अंश सेल्सियस पर्यंत वाढू शकते, असा अंदाज आहे. दुसरीकडे मराठवाडा, विदर्भातही अशीच स्थिती राहू शकते. परंतु मराठवाड्यातील लातूरसारख्या काही भागात 9 एप्रिल रोजी हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी पाऊस तर काही ठिकाणी उन्हाच्या झळा वाढू शकतात.

## गर्भवतीसाठी 15 हजारांची दलाली, डॉ. राजपूत अन् डॉ. आहेरचे कनेक्शन उघड

### सातारा गर्भपात रॅकेटमध्येही 6 वर्षे जुनेच साथीदार सक्रिय

■छ. संभाजीनगर। प्रतिनिधी,

मराठवाड्यासह पुणे आणि ठाणे येथे सहा वर्षांपासून सातत्याने गर्भपाताच्या रॅकेटचा मुख्य सूत्रधार असलेल्या डॉ. सुनील राजपूतचे नाव पुन्हा एकदा समोर आले आहे. दोन दिवसांपूर्वी साताऱ्यात उघडकीस आलेल्या गर्भपाताच्या रॅकेटमधील पीडितेची तपासणी याच राजपूतने केल्याचे डॉ. विकास आहेरने जबाबात सांगितले आहे. पीडितेचा संदर्भ देण्यासाठी त्याला राजपूतने 15 हजार रुपयांचे कमिशन ऑनलाइन दिले होते. सातारा पोलिसांनी वर्षा बाबासाहेब जाधव आणि उज्ज्वला विठ्ठल गायकवाड या दोन बहिणींच्या घरात छापा टाकत गर्भपाताचे नवे रॅकेट उद्ध्वस्त केले. दरम्यान, दोघी बहिणींकडे महिला रुग्ण पाठविणाऱ्या सिल्लोडच्या डॉ. आहेर याच्याही मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहते. पोलिसांनी आरोपींचे आर्थिक व्यवहार तपासणे सुरू केले असून वर्षा आणि ज्योती यांच्यात गेल्या काही महिन्यांत सातत्याने 10, 15, 30, 40 हजारांचे ऑनलाइन व्यवहार केल्याचे आढळले. यात राजपूत, वर्षा, ज्योती आणि इतरांमध्ये 90 हजारांपर्यंत ऑनलाइन पैसे पाठवले गेले.

**सातारा गर्भपात रॅकेटमध्ये जुनेच साथीदार सक्रिय, 90 हजारांपर्यंतचे ऑनलाइन व्यवहार**

अशातच, जून 2023 मध्ये राजपूतला अटक झाल्यानंतर त्याच्यासोबत पूजा नावाची शासकीय परिचारिकादेखील गजाआड झाली होती. राजपूत परिचारिकांना हेरून पैशांचे आमिष दाखवून गर्भपाताच्या रॅकेटमध्ये सहभागी करून घेत होता. राजपूत आणि डॉ. सतीश सोनवणे यांची जुनीच टोळी पुन्हा सक्रिय झाल्याचा संशय आहे. छावणी, वाळूज, पुंडलिकनगर तसेच ठाणे, पुणे येथे गर्भपाताचे गुन्हे दाखल असलेला डॉ. सुनील राजपूत अजूनही दुष्कर्मात सक्रिय असल्याचे उघडकीस आले आहे. जून 2023 मध्ये त्याला वाळूज पोलिसांनी अटक केली होती. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे. मात्र या घटनेनं पुन्हा एकदा गर्भपाताच्या रॅकेटचा मुद्दा चर्चेत आला आहे.



## नामांकित आयटी कंपनीत महिलांवर अत्याचार... 6 आरोपींना अटक, नाशिकमध्ये पुन्हा धक्कादायक घटना

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमधील नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांवर विनयभंग, लैंगिक व मानसिक अत्याचाराचे प्रकरण उघड झाले आहे. धार्मिक भावना दुखावल्याचाही आरोप करण्यात येत आहे. महिला विनयभंग आणि लैंगिक अत्याचार प्रकरणी आतापर्यंत 9 गुन्हे दाखल झाले आहेत. 6 आरोपींना नाशिक पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाची गांभीर्य लक्षात घेऊन रक्ळची (विशेष तपास पथक) स्थापना करण्यात आली आहे.

पीडित महिलांच्या तक्रारीसाठी पोलिसांकडून हेल्पलाइन नंबर जारी 9123232311

या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. सर्व खासगी संस्थांना महिलांच्या सुरक्षेबाबत कडक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. आणखी पीडित महिलांच्या तक्रारीसाठी पोलिसांकडून हेल्पलाइन नंबर जारी 9123232311 तसेच कंट्रोल रूम 112 वर संपर्क करता येणार आहे. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाणार आहे. भोंदू बाबा अशोक खरात नंतर नाशिकमध्ये बहुराष्ट्रीय कंपनीतील आणखी महिलांचे लैंगिक शोषणाचा प्रकरण समोर आल्याने खळबळ उडाली आहे. सर्व आरोपींना थोड्याच वेळात नाशिकच्या सत्र न्यायालयात हजर केले जाणार आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणानंतर नाशिकमध्ये महिला लैंगिक अत्याचार असे अनेक प्रकरण समोर आले आहेत. भोंदू अशोक खरात, रवींद्र एरंडे प्रकरणानंतर आणखी एक महिला लैंगिक अत्याचाराचे प्रकरण समो आले आहे. या प्रकरणात दखल चौकशीसाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे.

**अहिल्यानगरचे माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल**

अहिल्यानगरचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हा अध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर आणखी एक अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. नोकरीचे आमिष दाखवून पाण्याच्यातून गुंगीचे औषध पाजून एका महिलेवर अत्याचार केल्याचा दुसरा गुन्हा भिंगार पोलिस ठाण्यात सत्तावीस वर्षीय पीडितेने दाखल केला आहे. लोकसभा निवडणुकीत प्रचाराच्या निमित्ताने ओळख झालेल्या पीडितेला नगर क्लब जवळ नेऊन गुंगीचे औषध पाजून अत्याचार केला अशी तक्रार पीडितेने दिली आहे.. तसेच हा प्रकार कुटुंबातील कोणाला सांगितला तर मी तुझे व्हिडिओ काढले आहेत ते व्हिडिओ व्हायरल करेल अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. सोबतच मला ज्यावेळेस तुझी आठवण येईल त्यावेळी तुला यावे लागेल नाही आली नाहीस तर मी तुझे फोटो- व्हिडीओ व्हायरल करेल आणि तुझा काटा काढील असा दम दिल्याचे फियार्दीत म्हंटले आहे. अभिषेक कळमकर यांच्यावर हा अत्याचाराचा दोन महिन्यात दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. यापूर्वी अभिषेक कळमकर यांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये शिरूर येथील एका महिलेवर अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल असून त्या गुन्ह्यात अद्यापही अभिषेक कळमकर फरार आहे. पोलीस त्याचा शोध घेत असताना आता भिंगार पोलीस स्टेशनमध्ये अत्याचाराचा दुसरा गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# मुंबई हादरवण्याचा कट उधळला!

## मुलांच्या खेळण्यांत लपवले होते बॉम्ब? पोलिसांची मोठी कारवाई



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई पोलिसांनी अत्यंत गोपनीय माहितीच्या आधारे मोठी कारवाई करत शहरात घातपात घडवण्याचा कट उधळून लावला आहे. जप्त करण्यात आलेल्या खेळण्यांमध्ये संशयास्पद वस्तू आढळल्या असून, फॉरेन्सिक टीमद्वारे त्यांची तपासणी केली जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

दिल्ली पोलिसांनी केलेल्या ताज्या दहशतवादी कारवाईमुळे भारताच्या सुरक्षा क्षेत्रात एक बदल दिसून आला आहे, जिथे युद्धभूमी डिजिटल आहे, भरती तरुण आहेत आणि साधने लहान आणि स्वस्त आहेत. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या पथकाने रविवारी मुंबईतील कुर्ला आणि खडवली येथून दोन संशयितांना अटक केली. या अटकेमुळे केवळ एक मॉड्यूल उघड झाले नाही, तर एक पद्धत उघडकीस आली: ऑनलाइन कट्टरतावाद, टेलिग्रामसारख्या एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मद्वारे संप्रेषण आणि खेळण्यांच्या कारसारख्या दैनंदिन वस्तूंचा वापर करून बनविलेले बॉम्ब. आयईडी (इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइसेस) तैनात करण्यासाठी रिमोट-नियंत्रित खेळण्यांचा विचार केला जात असल्याचे तपासकर्त्यांचे म्हणणे आहे.

अटक करण्यात आलेले लोक पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मद (जेईएम) शी संबंध असलेल्या "आयएसआयएस-प्रेरित" मॉड्यूलचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. मोसाब अहमद उर्फ कलाम, मोहम्मद हमद, कामरान उर्फ सोनू या मोज आणि बडा इम्रान या संशयितांकडून चॅट आणि डिजिटल अकाउंट्ससारखे आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले आहे. हे संशयित "मिशन खिलाफत" आणि "सोल्जर्स ऑफ जिहाद" सारख्या ऑनलाइन ग्रुपवर सक्रिय होते आणि तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की हा गट खेळण्यांच्या कारचा वापर करून दिल्ली आणि मुंबईत हल्ले करण्याच्या प्रक्रियेत होता.

**टेलिग्रामचा वापर करून ऑनलाइन कट्टरतावाद**

पोलिसांचे म्हणणे आहे की आरोपी जवळजवळ पूर्णपणे ऑनलाइन कट्टरपंथी होते. टेलिग्रामसारख्या प्लॅटफॉर्मचा वापर हँडलरद्वारे केला जात होता, जे बऱ्याचदा परदेशात सुरक्षित आश्रयस्थानांमध्ये असतात किंवा संघर्ष क्षेत्रातून काम करतात- ऑपरेटिव्हची भरती करण्यासाठी, त्यांना शिकवण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांना कधीही न भेटता. या प्रकरणात, अबू हुफीझा नावाच्या एका व्यक्तीने इस्लामिक स्टेटमध्ये भरती करणारा म्हणून काम केले आणि जैश-ए-मोहम्मदशी संबंध ठेवले. आणि संपूर्ण दहशतवादी यंत्रणेचा सर्वात चिंताजनक घटक म्हणजे भरतीचे वय आणि प्रोफाइल. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भरती झालेल्यांपैकी बहुतेक किशोरवयीन आहेत, मुंबईतील किमान चार ते पाच अल्पवयीन मुले आता आयएसआयएसच्या प्रचाराच्या संशयावरून चौकशीच्या खाली आहेत. हे पूर्वीच्या पॅटर्नपेक्षा एक मोठे प्रस्थान चिन्हांकित करते. पूर्वी, दहशतवादी मॉड्यूल्स प्रत्यक्ष नेटवर्क, सीमेपलीकडील घुसखोरी, वैचारिक प्रशिक्षण शिबिरे इत्यादींवर अवलंबून होते, परंतु नवीन मॉडेल मोठ्या प्रमाणात आभासी आणि शांत आहे. असुरक्षित किशोरवयीन मुले, बहुतेकदा एकाकी पडतात किंवा ओळखीच्या शोधात असतात, ते सहजपणे या क्युरेट केलेल्या इकोसिस्टममध्ये ऑनलाइन ओढले जातात, जे हळूहळू अतिरेकी कल्पनांना सामान्य करतात. बॉम्ब वाहक म्हणून खेळण्यांच्या कारचा वापर हा आणखी एका विकसित होत असलेल्या प्रवृत्तीचे सूचक आहे - मोठ्या, उच्च-प्रभाव स्फोटांपासून लहान, शोधण्यास कठीण ऑपरेशन्सकडे वळणे. सुरक्षा तज्ञ याचे वर्णन "कमी-खर्चिक, उच्च-प्रभाव" युक्ती म्हणून करतात. या पद्धती सहज उपलब्ध असलेल्या सामग्रीवर अवलंबून असतात आणि शोध टाळण्यासाठी, दहशत निर्माण करण्यासाठी आणि सुरक्षा संसाधने ताणण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. आयईडी हल्ल्यांच्या विपरीत, ज्यासाठी महत्त्वपूर्ण लॉजिस्टिक नियोजन आवश्यक आहे. दहशतवादी गटांनी "लोन वुल्फ" हल्ले किंवा वाहनांना टक्कर देणे किंवा ड्रोन-आधारित हल्ले यासारख्या सुधारित साधनांचा वापर करून "लोन वुल्फ" हल्ले किंवा स्मॉल-सेल ऑपरेशन्समध्ये बदल केला आहे आणि वाढत्या प्रमाणात प्रोत्साहित केले आहे. टॉय कार बॉम्ब संकल्पना या व्यापक पॅटर्नमध्ये बसते. तपासातून जे समोर येते ते विकेंद्रित, अत्यंत अनुकूल आणि डिजिटल परिसंस्थेत खोलवर रुजलेल्या धोक्याचे चित्र आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणांसमोर एक जटिल आव्हान उभे राहिले आहे. पाळत ठेवणे, माहिती देणे आणि भौतिक ट्रॅकिंग यासारख्या पारंपारिक पद्धतींना आता प्रगत सायबर क्षमता, डेटा विश्लेषण आणि रिअल-टाइम ऑनलाइन मॉनिटरिंगद्वारे समर्थित केले जाणे आवश्यक आहे. त्याच वेळी, तज्ञांचे म्हणणे आहे की केवळ पोलिसिंगमुळे समस्येचे मूळ सुटणार नाही. या नेटवर्कला पोसणारी पाइपलाइन विस्कळीत करण्यासाठी अँटी-रॅडिकलायझेशन प्रयत्न, समुदाय सहभाग आणि डिजिटल साक्षरता वापरणे आवश्यक आहे.

# मुंबईत लाज आणणारी घटना

## महिलेच्या छातीला स्पर्श करून आरोपी पळाला विनयभंग करणाऱ्या नराधमाच्या आवळल्या मुसक्या

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एक तरुण रस्त्यावरून फिरणाऱ्या महिलांच्या छातीला स्पर्श केल्याचा भयंकर प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी संबंधित आरोपीला महिलांची छेडछाड करणाऱ्या आरोपीला अटक केली, या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही तपासले. आश्चर्याची बाब म्हणजे, तपासातून, असे उघड झाले की तो केवळ एकच नाही, तर अनेक प्रकरणांत त्याचे नाव होतं. संबंधित तरुणाचे नाव मुनवर नासिर खान असे आहे. पोलिसांच्या माहितीनुसार मुनवर हा आरे कॉलनीतील रहिवासी आहे.

**व्यक्ती रॉंगसाईटने आला आणि तरुणीच्या छातीला स्पर्श केला**

बांगूर नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी रवींद्र आव्हाड यांनी सांगितलं की, 30 मार्च रोजी सुमारे साडेनऊ वाजता एक तरुण घरी परतत होती. ती आपल्या कुटुंबासोबत रात्रीच्या जेवणासाठी गोरेगाव कॉम्प्लेक्सजवळील एका हॉटेलमध्ये गेली होती. जेवण झाल्यानंतर ती आपल्या कुटुंबासोबत बाहेर पडली असता, एक व्यक्ती रॉंगसाईटने आला आणि तरुणीच्या छातीला स्पर्श केला.

**कुटुंबियांनी पाठलाग केला असता, तरुण घटनास्थळावरून पळाला**

दरम्यान, कुटुंबियांनी त्याचा पाठलाग केला असता, पण तो घटनास्थळावरून निसटून गेला. त्यांनी दुचाकीवरील नंबर घेतला, नंतर बांगूर नगर पोलिसांना याबाबत तक्रार नोंदवली. पीडितेनं तात्काळ बांगूर नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. हे प्रकरण गंभीर मानून, पोलिसांनी आरोपीला ओळखण्यासाठी परिसरातील एकूण 29 सीसीटीव्हीचा तपास केला. सततच्या तांत्रिक तपासाच्या आणि सांघिक प्रयत्नांच्या जोरावर, पोलिसांनी केवळ 48 तासांच त्याचा माग काढला, त्याची ओळख पटवली आणि त्याला अटक करण्यात आली.

**आरोपी तरुणाला अटक**

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी आरे कॉलनीचा रहिवासी आहे. त्याला मयूर नगरमधील जेमिनी एसआरए बिल्डिंगमधून अटक करण्यात आली. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांच्या अटकेनंतर, पोलिसांनी त्याच्यावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला. बांगूर नगर पोलिसांनी सांगितलं की, मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यापूर्वी त्याने एका तरुणीसोबत असा गुन्हा दाखल केला. या संपूर्ण प्रकरणाची कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



## संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# युद्धाचे दूरगामी परिणाम!

भारतासारख्या आशियाई देशांनाच नव्हे, तर जगातील अनेक देशांच्या दृष्टीने 'युनायटेड अरब अमिरात' (युएई) या देशाचा महत्त्वाचा भाग असलेले दुबई हे शहर एका स्वप्ननगरीप्रमाणे आहे. तेथील सुरस कथा ऐकण्यासाठी अजूनही अनेक जण उत्सुक असतात. भारतातील विशेषतः चित्रपटसृष्टीतील वलयांकित व्यक्ती, नेते, उद्योजक किंवा कुख्यात गुंड यांच्यासाठी दुबई म्हणजे मेजवान्या करण्याचे आणि व्यावसायिक बोलणी करण्याचे ठिकाण आहे. दुबईतील जगातील सर्वांत उंच 'बुर्ज खलिफा' इमारतीतील भारतीय श्रीमंतांची घरे हा विशेषतः एक चर्चेचा विषय असतो. 'युएई'सह दुबईमध्ये उच्च श्रेणीतील नोकऱ्या, व्यवसाय यांपासून कामगारांपर्यंत भारतियांची संख्या प्रचंड आहे. दुबईत १५ ते २० लाख, म्हणजे लोकसंख्येच्या ४० टक्के भारतीय आहेत. अर्थातच ही स्वप्ननगरी दुबई निर्माण करण्यात तेथील दूरदृष्टी असलेले दुबईचे तत्कालीन शासक शेख रशीद बीन सईद अल् मकदूम यांनी वर्ष १९६० ते १९९० या काळात प्रचंड मेहनत घेतली होती. नियोजनबद्धरित्या दुबईचा अत्याधुनिक पद्धतीने विकास केला. पर्यटनाचा आदर्श निर्माण करण्यासाठी जे जे म्हणून लागते, ते सर्व काही तेथे आहे. विशेषतः तेथील पोलीस प्रशासन आणि कायदा अन् सुव्यवस्था! दुबईत चोऱ्या आणि स्त्रियांवर सार्वजनिक ठिकाणी होणारे अत्याचारही अत्यंत अत्यल्प आहेत; कारण या प्रकरणांत तिथे अतिशय कठोर कारवाई केली जाते. तेथील ही सुरक्षितता दुबईला स्वप्ननगरी म्हणून मिरवण्यात मोठा वाटा उचलते. करमुक्त असूनही दुबई हे स्थिर अर्थव्यवस्थेचे केंद्र म्हणून उदयास आले. अन्य इस्लामिक देशांमध्ये काही ना काही कारणामुळे अशांतता असली, तरी दुबईने स्वतःला यापासून दूर ठेवले. या तटस्थपणामुळे ती यशस्वी झाली. वाळवंटासारख्या ठिकाणी अमेरिकेतील शहरांशी तोडीस तोड नगरी उभी करणे सोपे काम नव्हते; परंतु शेख यांनी बंदरे, पूल, रस्ते, उंच इमारती आदी उभे करून दुबईला एक जागतिक पर्यटन आणि व्यापार केंद्र अन् मायानगरी बनवले. त्यांचा मुलगा महंमद बीन रशीद यानेही त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत तिला अत्याधुनिक जागतिक शहर बनवून पुढे नेले. जगभरातून तिथे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी वडिलांनी आखलेल्या धोरणांचा विकास केला. येथील उंचच उंच इमारती वास्तूकलेसमवेतच वाळवंटातील परमोच्च इच्छाशक्तीचा विजय म्हणून मिरवतात. वर्ष १९९० मध्ये झालेले आखाती युद्ध किंवा कोरोना महामारीनंतर जगावर आलेले आर्थिक संकट दुबईने लीलया पेलले; पण तिच्यावर परिणाम होऊ दिला नाही. आता मात्र अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण या युद्धाचा मोठा परिणाम जगाप्रमाणेच गगनचुंबी इमारतींची ही नगरी आणि जागतिक व्यापार केंद्र असलेल्या दुबईवर झाला आहे. अमेरिकेच्या मालमत्ता आणि तळ असलेल्या दुबईतील स्थानांवर इराणने ड्रोन आक्रमणे केली. दुबईतील भारतीय किंवा पर्यटक यांच्यावर त्यांचा विशेष परिणाम झाला नाही. भारतियांनी त्यांच्या तेथील जीवलगांना संपर्क केल्यावर ते सुरक्षित किंबहुना मजेत असल्याचे चित्रण त्यांना पाठवले खरे; परंतु आता जवळजवळ दीड महिना उलटून गेल्यावर या युद्धाचे दुबईवरील दूरगामी परिणाम समोर यायला लागले आहेत; ते कदाचित् इतके गंभीर असू शकतात की, युद्ध असेच चालू राहिल्यास परत तिथे उंटावरून फिरण्याची वेळ आली नाही म्हणजे मिळवले! जगात सर्वांत व्यस्त असलेल्या येथील विमानतळावरील विमानांना लांबचा पर्यायी मार्ग शोधावा लागलेला आहे. अनेक उड्डाणे रहित करावी लागली. युद्धामुळे इंधनाचे दर वाढल्याने तिकिटाचे दरही वाढले, तसेच युद्धामुळे एक प्रकारची भीती आणि अनिश्चितता निर्माण झाली आहे. या दोन्हींमुळे पर्यटकांची संख्या थेट १५ ते ५० टक्क्यांनी न्यून झाली आहे. पर्यटन व्यवसायात अंदाजे साडेपाच सहस्र कोटी रुपये हानी प्रतिदिन होत असल्याचे म्हटले जात आहे. काही वृत्तांनुसार पर्यटक येणे जवळजवळ बंदच झाले आहे, तर काहींच्या मते हा युद्धाचा तात्पुरता परिणाम असू शकतो; पण युद्ध थांबण्याचे नाव घेत नाही, ही सध्याची स्थिती आहे. त्यामुळे येथे होणारे काही आंतरराष्ट्रीय महोत्सव किंवा मेजवान्या, समारंभ आदी कार्यक्रमांसाठी येणारे पर्यटक येईनासे झाले आहेत. महागडी हॉटेल्स, त्यांतील कामगार, 'मॉल', मनोरंजन, स्थानिक बाजार आदी व्यवसायांवर पर्यटक, तसेच कच्च्या मालाच्या अभावी परिणाम झाला आहे. हॉटेल व्यवसाय ७० ते ८० टक्के बंद झाल्याची वृत्ते येत आहेत. अब्जावधीची गुंतवणूक बुडल्याने शेअर (समभाग) बाजारावरील गुंतवणूकदारांचा विश्वास न्यून होत आहे. हॉर्मुझसारख्या सामुद्रधुनीचे मार्ग बंद झाल्याने आयात-निर्यात महाग अन् कठीण झाली आहे. रशिया, चीन यांसारख्या देशांशी जोडलेले येथील बंदरावरील मालाचे आयात-निर्यात केंद्र निष्क्रीय होत आहे. युद्धामुळे नौकांचे मार्ग आणि माल पुरवठ्याची साखळी (सप्लाय चेन) यांवर मर्यादा आल्या आहेत. तेलाच्या किमती जगभर वाढल्याने त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्था मंदावण्यावर होऊ शकतो आणि त्याचा परिणाम पर्यटनावर होऊ शकतो. युद्धग्रस्त भागातून लोक आश्रयासाठी दुबईकडे वळत आहेत. त्यामुळे दुबईची लोकसंख्या वाढून दुबईतील मूलभूत सुविधांवर ताण येण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. या सर्वांमुळे 'पर्यटन केंद्र दुबई आता सुरक्षित आहे का?', असा प्रश्न निर्माण झाला आहे. युद्धाच्या अप्रत्यक्ष परिणामांमुळे दुबईची आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळत आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीचा मार्ग युद्धामुळे बंद झाल्याने अनेक मोठे आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार तेथील गुंतवणूक काढून घेतात कि काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय आस्थापने त्यांची कार्यालये भारत किंवा अन्य देशांत हालवण्याची चिन्हे आहेत. युद्धामुळे कामगारांनी त्यांच्या देशात परत जाण्यास निघणे आणि कच्चा माल येण्यातील अडथळे यांमुळे बांधकाम व्यवसायावर परिणाम झाला आहे. युरोप किंवा भारत येथील श्रीमंत लोक हे दुबईतील मालमत्ता खरेदी करतात; ते या युद्धामुळे सावध झाले आहेत. त्यामुळे स्थावर मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवसाय, जो दुबईच्या अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे, तो डळमळीत होऊ लागल्याची चिन्हे आहेत. नवे गृहप्रकल्प रखडल्याने ३० टक्के मंदी आल्याचे अहवाल आहेत. मालमत्तांच्या किमती १० टक्क्यांनी घसरल्या आहेत. सामान्यांसाठी वीज आणि पाणी यांचे देयक दुप्पट झाले आहे. वाळवंटी भाग असलेल्या आणि पर्यटनाच्या या शहरात धान्य, भाज्या, फळे ९० टक्के आयात कराव्या लागत असल्याने सामान्य नोकरदारांना ते परवडेनासे झाले आहे. अतिशय कष्टाने उभे राहिलेल्या शहराची युद्ध काय स्थिती करू शकते? याचे हे उत्तम उदाहरण आहे. जगाला स्वर्ग वाटणाऱ्या दुबईची ही स्थिती युद्धाच्या आरंभी निर्माण झाली आहे. युद्ध अनेक काळ चालू राहिल्यास जगावर त्याचे किती गंभीर परिणाम होतील, याची कल्पना आपण यातून करू शकतो!

# अमेरिकेसारखी अवस्था व्हायला फार काळ लागणार नाही...



मानवी श्रमाला किंवा भावभावनांना पैशाच्या तराजूत तोलणाऱ्या आणि दिखाऊ-बाजारू व्यवस्थेला विकास समजणाऱ्या व्यवस्थेचे आपण वाहक बनलो आहोत. आपल्या भारतीय समाजाची अवस्थासुद्धा पत्ता हरवलेल्या अमेरिकेसारखी व्हायला फार काळ लागणार नाही.

परवा बंगळुरू येथील उच्चशिक्षित सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुणाने अमेरिकेच्या आयटी कंपनीतील नोकरी गेल्यामुळे आत्महत्या केली. सकाळी ६ वाजता आलेल्या एका साध्या ई-मेलने प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून काढून टाकण्यात आले. पण तो एकटाच नव्हता, तब्बल १२,००० भारतीय कर्मचाऱ्यांना एकाच दिवशी, एकाच प्रकारे कामावरून कमी करण्यात आले. ही घटना ज्या कंपनीत घडली, तिला नुकताच ५१,००० कोटींचा विक्रमी नफा झाला होता. म्हणजेच, ही कपात आर्थिक अडचणीमुळे किंवा युद्धामुळे नव्हे, तर उपयोगितेच्या बदललेल्या प्राधान्यक्रमांमुळे करण्यात आली होती, हे स्पष्टच आहे.

ज्यावेळी मानवी श्रमाची गरज कमी कमी होत जाऊन त्याची जागा मशीन घेते, तेव्हा काम करण्याची पद्धत बदलून जाते. १९९० च्या जागतिकीकरण-खासगीकरणाच्या धोरणानंतर आपल्या देशात आलेल्या संगणकीय तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणात तरुण परदेशात जाऊन विविध सॉफ्टवेअर देशी-परदेशी कंपन्यांमध्ये नोकऱ्या करू लागले. त्यावेळी आलेल्या संगणकीय प्रणालीचा परिणाम सरकारी कर्मचाऱ्यांवर झाला, तर आता आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये प्रचंड खळबळ माजली आणि हजारो लोकांना आपली रोजगाराची साधने बदलावी लागली किंवा नोकऱ्या सोडाव्या लागल्या.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत मानवी मूल्यांची जपणूक होत नसेल, तर हा विकास कोणासाठी? असा प्रश्न निर्माण होतो. अमेरिकेसारख्या देशांमध्ये आज प्रचंड बेरोजगारी आहे. आपणही अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकत त्याच दिशेने जात आहोत. अशावेळी अमेरिकेच्या अंतर्गत समाजामध्ये अस्थैर्याच्या टोकदार जाणिवा किती भयानक आहेत, हे पु. ल. देशपांडे यांच्या लेखातून कळून येतं. 'जिथे जीवन म्हणजे काहीतरी विकून श्रीमंत होण्याची संधी एवढाच अर्थ होतो, तिथे मढी पुरायची जागा विकली काय किंवा पिढीच्या पिढी गारद करणारी एलएसडी - गांजा-अफू विकली काय, सारे काही संस्कृतीला साजेसेच आहे.

शस्त्रास्त्रांची विक्री थांबेल म्हणून ज्यांचे सोयरसुतक नाही, अशा देशांत जाऊन बॉम्बचा वर्षाव करायचा! काय विकतो आणि त्या विक्रीच्या वस्तूंचे काय परिणाम होतील, याचा विचार न करता विकत राहायचे. त्यांच्या बाजारपेठा शोधायच्या, त्या विक्रीसाठी जाहिरातीच्या नव्या नव्या क्लृप्त्या काढायच्या, त्यात मग विकणाऱ्या-विकणाऱ्यांची भयानक चढाओढ! बाजारात येणारा दुसनाचा माल हुसकता हुसकता तो माल विकणाऱ्यालाच कसे हुसकता येईल, याच्या योजना आखायच्या. गिऱ्हाईकाची हे बरे की ते बरे? याचा विचार करण्याची विचारशक्तीच नष्ट करायची. हे सारे करताना कसलाही विधिनिषेध बाळगायचा नाही. वरील उतारा १९७४ साली प्रकाशित पु. ल. देशपांडे यांच्या 'जावे त्यांच्या देशा' या पुस्तकातील आहे. आज अचानक या लेखाची प्रकर्षाने आठवण येत आहे. 'जावे त्यांच्या देशा' हे पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले प्रवास वर्णन. व्हेनिस, रोम, इटली, सॅनफ्रान्सिस्को, हंगेरी आणि अमेरिका या देशातील प्रवासातील अनुभव आणि निरीक्षणे या पुस्तकात पु. ल. देशपांडे यांनी नोंदवली आहेत. त्यापैकी 'एक बेपत्ता देश' हा अमेरिकावर आधारित आहे. सत्तरच्या दशकातील अमेरिका आणि आजचा अमेरिका यांच्या मानसिकतेमध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही, परंतु १९७० चा भारत आणि आजचा भारत यामध्ये मात्र प्रचंड अंतर पडलेले दिसते.

या लेखात अमेरिकेत असणारी अस्थिरता आणि असुरक्षितता प्रकर्षाने जाणवते. त्याचे वर्णन करताना पु. ल. देशपांडे लिहितात, 'किती संपन्न देश! प्रचंड वस्तुभांडारे! नजर ठरत नाही अशा एकेक वास्तू. पण प्रत्येक मजल्यावर रिव्हॉल्व्हर्स घेऊन पोलीस उभे! कुठल्या क्षणी भडका उडेल सांगता येत नाही. अमेरिकन विचारवंतांची डोकी सुन्न झालेली. कुठल्याही अमेरिकन माणसाशी याबाबतीत बोलावे- अनेक कारणे सांगतात आणि शेवटी असहाय्यपणे माना हलवीत बसतात. कुणी व्हिएतनाम युद्ध म्हणतो - कुणी राजकारणी लोकांवर खापर फोडतो, कुणी अतोनात समृद्धीचे हे सैतानी अर्भक आहे म्हणतो, आम्ही अर्धपोटी म्हणून अभागी, तर अमेरिकेला अत्याहारामुळे झालेले अपचनाचे रोग!'

आज आपल्या देशाची 'भारत विरुद्ध इंडिया' अशी विभागणी झालेली असली तरी कोकाकोला दोन्ही ठिकाणी सारख्याच दरात मिळतो. म्हणजे साधन आणि समृद्धीमध्ये विभागणी झाली असली तरी कंपन्या दोन्हीकडे नफा सारखाच शोधतात. ७०-८० च्या दशकात भारतात पाणी विकणे आणि विकत घेणे निषेधार्थ होते. अनेक लोक पाणपोया लावून पुण्य पदरात पाडून घेत होते. आज मात्र शहरातच नव्हे, तर खेड्यापाड्यात सुद्धा बाटलीबंद पाणी विकत घेणे प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाते. हा मानसिकतेमध्ये असणारा बदल सहज झालेला नाही. भारताचे अमेरिकीकरण यापेक्षा काय वेगळे असणार आहे.

उपभोग आणि केवळ उपभोग हे लक्षण असणाऱ्या संस्कृतीचे आपण वाहक बनत आहोत. खाद्यपदार्थ असो की नवनवीन गाड्यांची मॉडेल्स, कपड्यांची नवी फॅशन असो की मॉलमध्ये जाऊन प्रचंड खरेदी करण्याची नशा असो, या चकचकीत दुनियेने सर्वांनाच वेडे केले आहे. 'जगण्याचे सूत्र केवळ पैसा' हेच असावे, अशी व्यवस्था निर्माण केली जात आहे. पैसा मिळवण्यासाठी कोणतेही खोटे कृत्य करण्याला ही मंडळी तयार असतात. ऑनलाइन गंडा घालणारे हजारो तरुण अडाणी नक्कीच नसतात. गंडा घातल्यानंतर किंवा ऑनलाइन फसवणूक केल्यानंतर त्या समोरच्या व्यक्तीला काय वेदना होतील, याची कोणतीही सोयरसुतक नसणारी पिढी या बाजार व्यवस्थेने निर्माण केली आहे.

अमेरिकन समाजाचे वर्णन करताना पु. ल. देशपांडे म्हणतात, 'या भ्रमिष्टांच्या समाजात घेरी आणणारी अस्थिरता हेच सत्य आहे. कुटुंब संस्था तर अशी काही डगमगू लागली आहे की, हे जहाज कुठे फुटणार ते कळत नाही!' पण हे केवळ अमेरिकेचे वर्णन आहे का? तर नाही, आज आपणही त्याच रांगेत आहोत.

लहानपणी माझी आजी चकव्याची गोष्ट सांगायची. चकवा आपल्याला रस्ते भरकटवतो, आणि विहिरीत ढकलतो असे तिने सांगितल्यावर प्रचंड भीती वाटायची. आज आपण अशाच चकव्यात गुरफटलो आहोत. लांबच लांब रस्ता आपल्याला चकवतो आणि बाजारू व्यवस्था आपल्याला मेंदू गहाण ठेवायला लावते. त्याला सहाय्यभूत ठरतात ती प्रसार माध्यमे आणि जाहिराती.

आनंदी जगण्याचे सूत्र पैसा हेच व्हावे आणि त्यासाठी कोणतीही कृती करायला तयार असणारी पिढी निर्माण करणे, हे बाजारू व्यवस्थेचे लक्षण असते. हे लक्षण आपल्या मनामनात कधी उतरले ते कळलेही नाही. कालची वस्तू आज निकामी होते. कालचे मॉडेल आज निकृष्ट ठरते, त्यातून सुरू होते नवीन वस्तू घेण्याची बाजार नियंत्रित नशा. कारण नवीन वस्तू विकणे हे बाजार व्यवस्थेचे तंत्र आहे. त्याशिवाय ती व्यवस्था चालणार कशी? यातूनच सुरू होते मेंदू गहाण टाकण्याची प्रक्रिया.

बाजारकेंद्रित व्यवस्था माणसांना 'युज अँड थ्रो', वापरा आणि फेकून द्या या मानसिकतेतून कार्य करायला लावते. ही मानसिकता आपल्या देशात रुजते आहे, त्याचे भान आपल्याला नाही ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. ही मानसिकता केवळ वस्तूंच्या संदर्भात नाही तर माणसांच्याही संदर्भात आहे. माणसांनाही आवश्यक असेल तेवढे वापरा आणि त्यानंतर टाकून द्या, अशी ही मानसिकता निर्माण करण्यात आली आहे. याच्या जोडीला माध्यमांमधून चालणाऱ्या सेक्स स्कँडल, खून, हाणामाऱ्या, बलात्कार, तंत्रमंत्र यांच्या बातम्या आणि व्हिडीओ यामुळे समाज जीवनामध्ये सामूहिक नैराश्य आणि भीतीचे वातावरण पसरत जाते.

आयुष्य सुंदर आहे आणि ते श्रमाने अधिक सुंदर करता येते, हा विचार नष्ट झाला आहे. मानवी श्रमाला किंवा भावभावनांना पैशाच्या तराजूत तोलणाऱ्या आणि दिखाऊ-बाजारू व्यवस्थेला विकास समजणाऱ्या व्यवस्थेचे आपण वाहक बनलो आहोत. आपल्या भारतीय समाजाची अवस्था सुद्धा पत्ता हरवलेल्या अमेरिकेसारखी व्हायला फार काळ नाही, असे आजचे धोकादायक अस्वस्थ वर्तमान आहे.

# आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा नवा मार्ग : प्रमुख शासकीय योजनांचा आढावा

**लेखक : राजु परशुराम भोये**

भारताच्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीत आदिवासी बांधवांचे योगदान अमूल्य आहे. महाराष्ट्रातील दुर्गम भागातील आदिवासी समाज मुख्य प्रवाहात यावा, त्यांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावावा, यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या जातात. शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार या चतुःसूत्रीवर आधारित या योजनांचा घेतलेला हा विशेष आढावा.

**1) खावटी कर्ज योजनाः कठीण काळातील आधार :** आदिवासी बांधवांना पावसाळ्यात किंवा रोजगाराच्या अभावी अन्नाची टंचाई भासू नये, यासाठी 'खावटी कर्ज योजना' अत्यंत महत्त्वाची ठरते. पूर्वी हे कर्ज स्वरूपात होते, परंतु आता त्याचे स्वरूप बदलून ती 'अनुदान' स्वरूपात राबविली जाते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना रोख रक्कम आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा (उदा. डाळी, तेल, साखर, मसाले) केला जातो. ही योजना विशेषतः भूमिहीन शेतमजूर आणि दुर्गम भागातील कुटुंबांना उपासमारीपासून वाचवण्यासाठी कवच म्हणून काम करते.

**2) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (विहीर योजना) :** शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ही योजना राबवली जाते. 'क्रांतीनायक बिरसा मुंडा' यांच्या नावाने चालणाऱ्या या योजनेअंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना नवीन विहीर खोदण्यासाठी, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी किंवा इनवेल बोअरिंगसाठी मोठे अनुदान दिले जाते. याशिवाय, सौर पंप किंवा वीज जोडणीसाठीही मदत केली जाते, जेणेकरून शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता बारमाही शेती करून स्वतःचे उत्पन्न वाढवू शकेल.

**3) शबरी आदिवासी घरकुल योजनाः** हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न : "प्रत्येकाला हक्काचे घर असावे" या उद्देशाने 'शबरी आदिवासी घरकुल योजना' राबवली जाते. ज्या आदिवासी कुटुंबांकडे स्वतःचे पक्के घर नाही किंवा जे कच्च्या झोपड्यांमध्ये राहतात, त्यांना या योजनेतून पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. ही योजना केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून, नागरी क्षेत्रातील गरजू आदिवासींनाही याचा लाभ दिला जातो. यात घराच्या बांधकामासोबतच स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयासाठीही अतिरिक्त निधी दिला जातो.

**4) शासकीय आश्रम शाळा समूह योजना :** आदिवासी मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच दर्जात्मक शिक्षण मिळावे, यासाठी 'शासकीय आश्रम शाळा' चालवल्या जातात. या शाळांमध्ये निवास, भोजन, गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचा सर्व खर्च शासन उचलते. 'समूह योजना' (Cluster Scheme) अंतर्गत अनेक आश्रमशाळांना एकत्र जोडून तिथे अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे आणि संगणक कक्ष उपलब्ध करून दिले जात आहेत, जेणेकरून आदिवासी विद्यार्थी जागतिक स्पर्धेत टिकू शकतील.

**5) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ योजना :** आदिवासी तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी हे महामंडळ कणा म्हणून काम करते. स्वयंरोजगारासाठी कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. छोटे व्यवसाय, वाहन खरेदी, किंवा कृषी आधारित उद्योग सुरू करण्यासाठी हे महामंडळ 5 लाख ते 20 लाखांपर्यंतचे कर्ज विविध योजनांच्या माध्यमातून उपलब्ध करून देते. यामुळे आदिवासी तरुणांची सावकारी पाशातून सुटका होऊन ते स्वतःच्या पायावर उभे राहत आहेत.

**6) आदिवासी महिला सशक्तिकरण योजना :** महिला ही कुटुंबाचा कणा असते. आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी ही विशेष योजना आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. तसेच हस्तकला, वनौपज (उदा. महुवा, मध, डिंक) प्रक्रिया उद्योग आणि कुक्कुटपालनासाठी विशेष अनुदान व बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. यामुळे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.


**7) पोलीस व सैनिक दल भरती पूर्व प्रशिक्षण योजना :** देशसेवा आणि सुरक्षितता क्षेत्रात आदिवासी तरुणांचा सहभाग वाढवण्यासाठी ही एक क्रांतिकारी योजना आहे. अनेक आदिवासी तरुणांमध्ये शारीरिक क्षमता उत्तम असते, परंतु योग्य मार्गदर्शना अभावी ते भरती प्रक्रियेत मागे पडतात. या योजनेअंतर्गत तरुणांना शारीरिक चाचणीचे सराव आणि लेखी परीक्षेचे मोफत मार्गदर्शन दिले जाते. प्रशिक्षणा दरम्यान निवास आणि भोजनाची सोयही सरकार मार्फत केली जाते, ज्यामुळे पोलीस आणि सैन्य दलात आदिवासींचे प्रमाण वाढत आहे.

**8) शेळ्या व मेंढ्या गट पुरवठा योजना :** अल्पभूधारक आणि भूमिहीन आदिवासींसाठी पशुपालन हा उत्पन्नाचा उत्तम स्रोत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 10 शेळ्या आणि 1 बोकड अशा गटाचा पुरवठा केला जातो. यासाठी 75% ते 90% पर्यंत शासकीय अनुदान दिले जाते. या उद्योगासाठी फार मोठ्या जागेची किंवा भांडवलाची गरज नसते, त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना ही योजना आर्थिक स्थैर्य मिळवून देत आहे.

शासनाच्या या सर्व योजना केवळ कागदावर नसून, त्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे ही प्रशासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. 'जल, जंगल आणि जमीन' यांच्याशी नाते सांगणारा आदिवासी समाज जेव्हा या आधुनिक योजनांशी जोडला जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने राज्याचा आणि देशाचा समतोल विकास साधला जाईल.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी बांधवांनी नजीकच्या 'एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प' कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक आहे. "प्रगतीचा हा नवा अध्याय, आदिवासींच्या समृद्ध भविष्याचा पाया आहे."

# सोशल मुस्कटदाबीचा घाट!




आजचा जमाना हा सोशल मीडियाचा आहे. कधीकाळी रेडिओ, टेलिव्हिजनने जनतेच्या केवळ ड्रॉईंगरुमचा ताबा घेतला होता. परंतु स्मार्टफोनच्या माध्यमातून सोशल मीडियाने जनतेच्या संपूर्ण मेंदूचा ताबा घेतला आहे. युजर घरात असो वा दारात, ऑफिसमध्ये किंवा प्रवासात, अगदी स्वच्छतागृहात बसूनही तो सोशल मीडिया हाताळत असतो. मनोरंजनाच्याही पलीकडे तो त्यातून आपली मते बनवत असतो. अत्यंत प्रभावी असलेल्या या सोशल मीडियाचा वापर जसा अजेंडे, नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी होतो तसाच तो खोटे नॅरेटिव्ह, फसवी माहिती खोडून काढत पडद्यामागचे सत्य लोकांपुढे आणण्यासाठीही केला जात आहे. इंडिपेंडेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर्सचा दबदबा सोशल मीडियात तयार झाला आहे. हा दबदबा मोडीत काढण्यासाठी आता केंद्र सरकार पावले उचलत आहे.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने आयटी नियम २०२१ मध्ये नुकताच बदलांचा नवीन मसुदा जारी केला आहे. या मसुद्यात अनेक नवीन आणि कठोर तरतुदी जोडण्यात आल्या आहेत. या तरतुदींच्या माध्यमातून केंद्र सरकार डिजिटल जगतातील कंटेंट क्रिएटर्स, एन्फ्लूएन्सर्सभोवती कारवाईचा फास आवळण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे या मसुद्याला सध्या जोरदार विरोध होत आहे. प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. कधीकाळी सरकार आणि जनतेच्या मधला दुवा अशी माध्यमांची प्रतिमा होती. अँटी एस्टॅब्लिशमेंट किंवा सत्तेविरोधात भूमिका घेऊन प्रसारमाध्यमे कुठल्याही चुकीच्या धोरणा-निर्णयाविरोधात आवाज उठवून सरकारच्या डोळ्यात अंजन घालायचे. शोध पत्रकारितेची मोठी परंपरा भारतीय मीडियाला होती. परंतु मागच्या काही वर्षांमध्ये देशातल्या बहुतांश मुख्य प्रवाहातील प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातून केवळ सरकारच्या सोयीचा असाच कंटेंट दाखवण्याचा, पेरण्याचा प्रवाह रुळला आहे. सत्ताधार्यांच्या विचारसरणीशी सुसंगत किंबहुना सरकारधार्जिण्या कंपन्यांनी देशातल्या मीडिया हाऊसेसमध्ये पसरलेले हातपाय हे यामागचे मुख्य कारण. त्यामुळे सरकारच्या हातचे बाहुले अशी समस्त भारतीय प्रसार माध्यमांची स्थिती झालेली आहे.

कुठलीही वृत्तांकने किंवा डिबेट शोमध्ये याचा पुरेपूर प्रत्यय येतो. याउलट सरकारी निर्णय-धोरणांना विरोध करणार्या प्रसार माध्यमांना एकतर सरकारी जाहिरातींपासून मुकावे लागते किंवा त्यांच्यामागे कारवाईचा ससेमिरा लागलाच म्हणून समजा. मागच्या काही वर्षांमध्ये निष्पक्ष पत्रकारितेच्या नावाखाली मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांमधून बाहेर पडून अनेक पत्रकारांनी आपापले स्वतंत्र युट्यूब चॅनेल सुरू केलेत. त्यातून ते सरकारच्या चुकीच्या निर्णयांविरुद्ध आवाज उठवत असतात. पडद्यामागील सत्य लोकांसमोर आणत असतात, चुकीचे नॅरेटिव्ह खोडून काढत त्याची विश्लेषणात्मक चिरफाड करत असतात. त्याशिवाय असे अनेक कंटेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्ल्यूएन्सर्स आहेत जे आपापल्या पद्धतीने कधी व्यंगात्मक, कधी गंभीर मुद्दे उपस्थित करून जनतेचे प्रबोधन करतात. मात्र, यामुळे अडचणीत येणार्या सरकारने अशा सगळ्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकवण्याचा घाट घातला आहे.

नव्याने तयार केलेल्या मसुद्यातील बदल विशेषतः युजर्स आणि कंटेंट क्रिएटर्स, एन्फ्लूएन्सर्स यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करणार्या सोशल मीडिया कंपन्यांसाठी आहेत. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास मध्यस्थ म्हणजे असे प्लॅटफॉर्म जिथे एखादा कंटेंट क्रिएटर्स कंटेंट तयार करून पोस्ट करतो आणि तो कंटेंट युजर्सपर्यंत अर्थात लोकांपर्यंत पोहोचतो. व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामसारखे मेसेजिंग अॅप्स, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्ससारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, गुगल आणि यूट्यूबसारखे सर्च आणि व्हिडिओ प्लॅटफॉर्म, ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टसारखे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि नेटफ्लिक्स व प्राईमसारखे ओटीटी प्लॅटफॉर्म हे सर्व या श्रेणीत येतात. तुम्ही ऑनलाईन वापरत असलेल्या जवळपास प्रत्येक सोशल मीडियाला हा नियम लागू होईल. या मसुद्यातील तरतुदींमुळे कुठलाही सोशल मीडिया, टेक आणि डिजिटल प्लॅटफॉर्म यापुढे मनमानीपणे वागू शकणार नाहीत. त्यांना सरकारी निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे, ॲडव्हायझरी पाळाव्याच लागतील. जर त्यांनी असे केले नाही, तर संबंधित डिजिटल मीडिया कंपन्यांना थेट जबाबदार धरले जाईल. या मसुद्यातल्या नियम ८वर सर्वाधिक आक्षेप आहे. याअंतर्गत आता बातम्या आणि चालू घडामोडींच्या कंटेंटची अधिक काटेकोरपणे तपासणी केली जाईल. हे नियम आता केवळ वृत्त प्रकाशकांपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर सामान्य युजर्स जिथे ते असा मजकूर शेअर करतात त्या प्लॅटफॉर्मनाही लागू होतील. याचा अर्थ असा की, जर एखाद्या वापरकर्त्याने युट्युबवरील बातम्यांसंबंधीचा व्हिडिओ किंवा बातमी व्हॉट्सॲपवर फॉरवर्ड केली किंवा फेसबुकवर एखादी स्टोरी शेअर केली, तर तो प्लॅटफॉर्म कारवाईसाठी जबाबदार धरला जाईल.

सोशल मीडियावर मागच्या काही दिवसांपासून एक व्हिडिओ खूपच व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ पंतप्रधानांवर व्यंगात्मक टीका करणारा असल्याचे म्हटले जात आहे. या व्हिडिओत परदेशी राष्ट्रप्रमुखाला भेटून पंतप्रधानांची व्यक्तिरेखा साकारणारा केवळ हसताना दाखवलेला आहे. ही व्यंगात्मक टीका सरकारला झोंबल्यानंतर हा व्हिडिओ तात्काळ सोशल मीडियावरून काढून टाकत संबंधित अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. तरीही विविध माध्यमातून हा व्हिडिओ व्हायरल झालाच. मागच्या काही दिवसांमध्ये हा व्हिडिओ सर्वाधिक व्ह्यूज मिळवणारा ठरला आहे. मध्यंतरी सरकारवर टीका करणारे असे बरेचसे युट्यूब चॅनेल व सोशल मीडियावरील अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. सरकारसाठी अडचणीचे ठरणारे निष्पक्ष पत्रकार आता निशाण्यावर आहेत. म्हणूनच पुढचे पाऊल म्हणून हा कायद्यात बदल केला जात आहे. जेणेकरून मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच सोशल मीडियाचीही मुस्कटदाबी करावी. निंदकाचे घर असावे शेजारी असे आपले संत महात्मे म्हणायचे. परंतु आजकाल सरकारवरील टीका म्हणजे देशावर केलेली टीका समजून त्याला देशद्रोही समजले जाते. आपण कधीच चुकू शकत नाही, असा भ्रम पाळणारे सत्ताधारी कितीही झाकले तरी कोंबडा आरवायचा रहात नाही, हे विसरले असावे. १४ एप्रिलपर्यंत केंद्र सरकारने या मसुद्यावर सार्वजनिक सूचना, हरकती मागवल्या आहेत. मात्र, सोशल मीडियावरील या सेन्सॉरशीपला देशातून जोरदार विरोध होईल, असेच दिसते.

# चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय



**चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.**

**अननस :** चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.



**आहार :** आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, कार्बोनेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.



**कोरफड :** चेहऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

**टी ट्री – ऑलिव्ह ऑइल :** एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

## बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

**सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत आहे.**



**आले :** सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

**तुळस :** ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.

## सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

**लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.**

**हृदयाला निरोगी ठेवतो :** लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकेजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.

**सर्दी आणि पडसं दूर करते :** हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

**इम्युन सिस्टीमला मजबूत करते :** लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

**डायरियापासून बचाव :** कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.



**डिटॉक्स :** हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

**फंगल इन्फेक्शन :** फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

**घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक :** हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.



## तुपातला बदामाचा शिरा

**साहित्य:** बदाम - 1 वाटी, तूप - पाऊण वाटी, साखर - पाऊण वाटी, दूध - 1/2 वाटी

**कृती:** सर्वात आधी रात्री पाण्यात भिजत घालावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी बदामाची सालं काढून टाका आणि ते मिक्सरमध्ये फिरवून त्याची जाडसर पेस्ट तयार करून घ्यावी. यानंतर कढईत तूप गरम करण्यास ठेवावे. तूप गरम झाल्यावर त्यात बदामाची पेस्ट टाका आणि मंद आचेवर व्यवस्थित लालसर होईपर्यंत परतून घ्यावे. लालसर झाल्यावर त्यात दूध टाका आणि एक उकळी आणावी. दूध पूर्णपणे आटल्यावर त्यात साखर घाला आणि मिश्रण शिजू द्या.


# हेअर कलर करा पण सांभाळून...

**आजकाल मुली असो वा स्त्रिया हेअर कलर करण्याचं क्रेझ वाढलं आहे. सध्या लेटेस्ट रंग वापरून आपल्या पर्सनालिटीला एक वेगळा लुक देता येतो. अलीकडे ब्राऊन, चॉकलेट, बरगंडी आणि ब्लैंड फॅशनमध्ये आहे. त्यातून हायलायटिंगचा ट्रेंड आहे. मात्र केसांना कलर देण्यापूर्वी त्यांचा प्रकार समजून घेणं गरजेचं आहे.**

### कलर करण्यापूर्वी हे करा

- कलर करण्यापूर्वी हेअर कटिंग किंवा ट्रिमिंग करून घ्या.
- कलरिंगसाठी दिलेल्या निर्देशांक पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे हेअर कलर करण्यापूर्वी ॲलर्जी टेस्ट करून घ्या.
- कलर वापरण्यापूर्वी दिलेल्या सूचना नीट वाचून घ्या.
- आपल्या केसांवर पूर्वी कधीच रंगांचा वापर केलेला नाही की ते आधीपासूनच रंगलेले आहेत. जे जाणून घेतल्यानंतर योग्य रंगाची निवड करा.
- कलर निवडण्यापूर्वी काही शंका असेल तर हेअर एक्सपर्टचा सल्ला घ्या.
- कलर करण्यापूर्वी एकाच आकाराचे फॉइल तयार ठेवा.
- अता व्ही शेपमध्ये केस घेऊन त्याचे पातळ सेक्शन करून घ्या. त्याखाली फॉइल ठेवून केसांना कलर करा आणि दोन्ही बाजूने दुमडून फोल्ड करा. हायलाइट एकासारखं असावं हे लक्षात असू द्या.
- कलर झाल्यावर अर्ध्या तासाने फॉइल काढा आणि केस धुऊन शेपू करा. केस





वाळल्यावर वेगळाच लुक येईल.

### हे करू नका

- कलर करताना केसांच्या मुळांना कलर लावू नका.
- वयाने जास्त असलेल्या स्त्रियांनी डार्क रंगाचा वापर करू नये.
- ओल्या केसांमध्ये कलर करू नये याने कलर स्कल्पवर पसरतो.
- कलर केलेले केस कधीच गरम पाण्याने धुऊ नये. याने कलर फिकट होऊ लागतो.
- दुर्सयांचं पाहून रंगाची निवड करू नये. आपल्याला जो शोभेल तोच कलर वापरा.

**चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहानापांसून थोरामोठ्यांपर्यंत चॉकलेट आवडीने खातात. मात्र दातांवर परिणाम होऊ नये यासाठी काहीजण चॉकलेट खात नाहीत. मात्र तुम्हाला माहीत आहे का चॉकलेट खाण्याचेही अनेक आश्चर्यकारक फायदेही आहेत.**

## चॉकलेट खाण्याचे हे आहेत फायदे

**तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर** – तणाव कमी करण्यासाठी चॉकलेट अधिक फायदेशीर आहे. डार्क चॉकलेट खाण्याने तणाव कमी होतो. उच्च रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन परिणामकारक ठरते. कोकोमध्ये असलेले अँटीऑक्सिडंटस स्वास्थ चांगले राखण्यासाठी मदतशीर ठरतात. हृदयासाठीही चॉकलेट फायदेशीर आहे. चॉकलेटच्या सेवनाने हृदयरोगाची शक्यता कमी होते. चॉकलेट खाण्याने व्यक्तीचा मूड सुधारतो. कोकोच्या सेवनाने थकवा कमी होण्यास मदत होते.

**वजन घटवण्यात गुणकारी** – ॅलिफोर्नियाच्या सॅन डिगो विद्यापीठात करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमितपणे चॉकलेट खाल्ल्याने वजन कमी होण्यात मदत होते. वैज्ञानिकांनुसार चॉकलेटमधील कोको फ्लॅवनॉल वाढत्या वयासंबंधित आजारांना दूर ठेवते. अमेरिकेच्या संशोधनानुसार, रोज हॉट चॉकलेटचे दोन कप सेवन केल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच स्मरणशक्तीही वाढते.



## प्रेग्नन्सी दरम्यान कारल्याचे सेवन करावे की करु नये, दूर करा कन्फ्यूजन

गर्भावस्थेत स्त्रिया आपल्या खाण्यापिण्याबद्दल फारच कॉन्शियस होऊन जातात. काय खायला पाहिजे काय नाही, या बद्दल बऱ्याच गर्भवती स्त्रियांना योग्य माहिती नसते. बऱ्याच महिला गर्भावस्थेत कारले खायला पाहिजे की नाही याबद्दल भ्रमित असतात. तर त्यांचे कंफ्यूजन आपण दूर करू. गर्भावस्थेदरम्यान कारल्याचे सेवन आई आणि बाळ दोघांच्या आरोग्यासाठी एक उत्तम विकल्प साबीत होऊ शकते. कारल्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बीटा-केरोटिन आणि आयट्री फायबर असत जे गर्भात वाढणारे बाळ आणि आई दोघांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असत.



**फायबरचे प्रमाण जास्त असतात :** कारल्यात फायबर उच्च मात्रेत असत ज्यामुळे भूक लवकर लागत नाही. हे हाय कॅलोरी फूड्स आणि जंक फूड्सच्या क्रेविंग्सला कमी करतो. त्याशिवाय हे प्रेग्नेंसीदरम्यान तुम्हाला लठ्ठ होण्यापासून देखील तुमचा बचाव करतो.

**टीऑक्सीडेंट असतो :** कारल्यात व्हिटॅमिन सी असत, जे एंटीऑक्सीडेंट असून गर्भवती महिलांना हानिकारक बॅक्टेरियापासून लढण्याची शक्ती देत. हे गर्भवती महिलांच्या रोगप्रतिकारकला देखील वाढवण्यास मदत करतो आणि रोगप्रतिकारक सिस्टमला बूस्ट करतो.

**बॉवेल मुव्हमेंटला योग्य ठेवतो :** कारले पेरिस्टालिसिसला बूस्ट देण्यास देखील मदत करतो जे नंतर बॉवेल हालचालला नियंत्रित करणे आणि गर्भवती महिलांच्या पचन तंत्राला योग्य करण्यात मदत करतो. कारले पचन तंत्राशी निगडित इतर समस्यांमध्ये देखील आराम देण्यास मदत करतो.

**फोलेट उच्च प्रमाणात असतो :** गर्भवती महिलांसाठी फोलेटची आवश्यकता असते. हे मिनरल्स संभावित न्यूरल ट्यूब डिफेक्टला सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. कारल्यात फोलेटची मात्रा फार जास्त असते. यामुळे गर्भवती महिलांमध्ये या मिनरल्सच्या दैनिक आवश्यकतेचे एक चतुर्थांश भाग आहे.

**अभ्रकाचा विकास करतो :** कारल्यात काही खास प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनिरल्सचा एक मोठा स्त्रोत असतो. यात आयरन, नियासिन, पोटॅशियम, पेंटोथेनिक ॲसिड, जिंक, पाइरोडॉक्सिन, मॅग्नीशियम आणि मॅंगनीज सामील आहे. याला म्हणून आपण सुपर भाजी म्हणू शकतो कारण हे भ्रूणच्या विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावतो.

# साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.**

**रिफाइंड** साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर



रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

## जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

## आहारातील 'हे' बदल करतील मदत

महिलांना अनेकदा मूड स्विंग्सचा सामना करावा लागतो. मूड स्विंग्स होण्याला मूड डिसऑर्डर असेही म्हटलं जातं. अनेकदा चिडचिड किंवा तणाव, लहान-सहान गोष्टींवर रडणं, ऑफिस किंवा घरातील गोष्टींचं टेन्शन घेणं पहायला गेलं तर ही लक्षण साधारण समजली जातात.

परंतु या लक्षणांनी जर गंभीर रूप धारण केलं तर मात्र पीडित व्यक्ती डिप्रेशनमध्ये जाण्याची शक्यता असते. महिलांना ही समस्या त्यांच्या शरीरात होणाऱ्या हार्मोनल चेंजेसमुळे होते. जर तुमच्यासोबचतही अशा गोष्टी होत असतील आणि त्यामुळे सतत तुमचा मूड चेंज होत असेल तर, तुम्हाला तुमच्या आहाराकडे विशेष लक्षं देण्याची गरज आहे.

काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या एका संशोधनातून असं सिद्ध झालं की, मूड स्विंग्स किंवा तणाव योग्य आहार न घेतल्यानेही होतो. अशातच डाएटमध्ये बदल करा आणि मूड स्विंग्सच्या समस्येपासून सुटका करा.



**ओमेगा ३ चा उत्तम स्त्रोत अंडी**

अंड्यामध्ये मुबलक प्रमाणात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, भरपूर प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स असतात. तणाव किंवा डिप्रेशनने त्रस्त असणाऱ्या लोकांसाठी अंडी अत्यंत फायदेशीर ठरतात.

**मूडसाठी उत्तम ठरतो नारळ**

मिडिअम चैन फॅटी ॲसिड नावाचं तत्व फक्त नारळामध्ये आढळून येतं. जे मेंदूचं आरोग्य राखण्यासोबतच मूडसाठीही फायदेशीर ठरतं. नर्वस सिस्टमसाठी उत्तम ठरतात केळी केळी म्हणजे, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअमचा उत्तम स्त्रोत. नर्वस सिस्टिमसाठी केळी अत्यंत फायदेशीर ठरतात. यांमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स बराच वेळ मूड ठिक ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतात.

**सेरोटोनिन नियंत्रणात ठेवतं अक्रोड**

अक्रोडमध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड, प्रोटीन आणि मॅग्नेशिअम मुबलक प्रमाणात असतं. अक्रोड मेंदूमधील सेरोटोनिनचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत करतात. यामुळे फक्त मूड चांगला होत नाही तर, तुम्हाला शांत झोप मिळण्यासाठीही मदत होते.

**तणाव कमी करतं लिंबू**

व्हिटॅमिन सी चा उत्तम स्त्रोत असणारं लिंबू तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतं. याचसोबत जर तुम्ही लिंबाचा आहारात समावेश केला तर आरोग्याच्या आणि त्वचेच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी मदत होते.

## 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या

**मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.**



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# मुंबईत बिबट्या शिरला, मालाडमध्ये खळबळ

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील वेगवेगळ्या भागात बिबट्याने धुमाकूळ घातल्याचे समोर आले होते. बिबट्याच्या हल्ल्यात काही नागरिकांसह अनेक पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले होते. अशातच आता शहरी भागातही बिबट्याने शिरकाव केल्याचे समोर आहे. राजधानी मुंबईतील मालाड पूर्व भागात बिबट्या आढळला आहे. एका रहिवासी सोसायटीमध्ये बिबट्या दिसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

मुंबईत बिबट्याचा शिरकाव

मुंबईच्या मालाड पूर्व भागातील रहेजा हाइट्स सोसायटीमध्ये बिबट्या दिसल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पहाटे सुमारे 3 ते 4 वाजण्याच्या दरम्यान सोसायटीच्या डी विंग परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये एक बिबट्या फिरताना दिसला. फुटेजमध्ये बिबट्या पार्किंग परिसरात फिरताना स्पष्टपणे दिसत असून, त्यामुळे रहिवाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. यावर लवकरात लवकर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

नागरिकांनी रात्रीच्या वेळी सतर्क राहण्याचे आवाहन

समोर आलेल्या माहितीनुसार याआधीही या सोसायटीमध्ये बिबट्याचा वावर पहायला मिळाला होता. त्यामुळे सोसायटीतील लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पाळीव प्राण्यांच्या सुरक्षिततेबाबत रहिवाशांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. पहाटेच्या वेळेस बिबट्या दिसल्याने परिसरातील नागरिकांनी रात्री व पहाटे बाहेर पडताना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे मालाड परिसरात पुन्हा एकदा वन्यप्राण्यांच्या वावराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आता प्रशासन आणि वनविभाग या बिबट्याचा बंदोबस्त नेमका कसा करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण**

सोसायटीतील रहिवासी विजयकुमार एन. बोरा यांनी सांगितले की, या भागात बिबट्या दिसण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही अशा घटना घडल्या आहेत, त्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या वारंवार वावरामुळे विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पाळीव प्राण्यांच्या सुरक्षेबाबत लोक चिंतित आहेत. रहिवाशांनी प्रशासन आणि वन विभागाकडे तात्काळ बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. तसेच कोणतीही अप्रिय घटना टाळण्यासाठी स्थानिकांमध्ये जनजागृती करण्याची गरज असल्याचेही समोर आले आहे.

# रायगडची आरोग्य व्यवस्था 'व्हेंटिलेटर'वर

## वरिष्ठ पदे रिक्त, रुग्णसेवेवर गंभीर परिणाम



■**अलिबाग। प्रतिनिधी,**

रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली असून, महत्त्वाची वरिष्ठ पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांवर मोठा परिणाम होत आहे. जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा कणा मानली जाणारी जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी ही महत्त्वाची पदे सध्या रिक्त आहेत. या पदांचा तात्पुरता अतिरिक्त कार्यभार संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आला असून, त्यामुळे प्रशासनावर ताण वाढला आहे.

सध्या जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा कार्यभार डॉ. निशिकांत पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. तर जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी या दोन्ही पदांचा पदभार सहाय्यक संचालक (कुष्ठरोग निर्मूलन) डॉ. प्राची नेहुलकर यांच्याकडे आहे.

दरम्यान, नियमित जिल्हा शल्य चिकित्सक पदावर असलेल्या अधिकाऱ्यांची अन्यत्र नियुक्ती झाल्यानंतरही त्या जागी नवीन नियुक्ती करण्यात आलेली नाही. तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे वेतन अद्याप रायगड जिल्ह्यातूनच दिले जात असल्याची माहिती समोर येत असून, या बाबीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अभावामुळे निर्णयप्रक्रियेत विलंब होत असून, त्याचा थेट परिणाम रुग्णसेवेवर होत आहे. तात्पुरत्या पदभारामुळे प्रशासकीय कामकाजावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, रिक्त पदांवर तत्काळ नियमित नियुक्त्या करणे, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करणे आणि जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

रायगडची आरोग्य व्यवस्था सध्या ह्यआयसीयूह्मध्ये असल्याची भावना व्यक्त होत असून, आता प्रशासन याकडे किती गांभीर्याने लक्ष देते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मुलुंड मेट्रो ४ दुर्घटना

## आणखी दोन आरोपींना जामीन मंजूर



■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुलुंड येथील मेट्रो मार्गिका ४ च्या कामादरम्यान झालेल्या जीवघेण्या पॅरापेट दुर्घटनेप्रकरणी सत्र न्यायालयाने सोमवारी आणखी दोन आरोपींना जामीन मंजूर केला. १४ फेब्रुवारी रोजी काँक्रीटचा एक मोठा भाग चालत्या वाहनांवर कोसळून झालेल्या या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता, तर तीन जण जखमी झाले होते. या घटनेनंतर पोलिसांनी सदोष मनुष्यवध, मालमत्तेचे नुकसान आणि समान हेतूने केलेले कृत्य या आरोपांखाली भारतीय न्याय संहितेच्या कलमांनुसार गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात जामीन मिळालेल्या दोन आरोपींमध्ये उपव्यवस्थापक सौरभ सिंह आणि सुपरवायझर प्रशांत भोईर यांचा समावेश आहे.

न्यायालयाने यापूर्वीच मागील आठवड्यात डीबी हिल एसबीजी कंपनीचे प्रकल्प संचालक हरीश चौहान, प्रकल्प व्यवस्थापक कुलदीप सपकाळ आणि अवधूत इनामदार या तिघांना जामीन मंजूर केला होता. या दोघांबाबतच्या सविस्तर आदेशाची प्रत अद्याप उपलब्ध झालेली नाही. गेल्या आठवड्यात तिघांना जामीन देताना न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, ही दुर्घटना वेल्डरच्या चुकीमुळे घडली आहे. हा अपघात अचानक घडला असून वेल्डरने त्याच्या वरिष्ठांच्या सूचनांचे पालन न केल्याने ही घटना घडल्याचे न्यायालयाने नमूद केले होते.

# सिंधुदुर्गातील ५२ मंदिरांचा होणार कायापालट

## ४ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर



■**सिंधुदुर्गनगरी। प्रतिनिधी,**

जिल्हा वार्षिक योजनेतील क वर्ग यात्रा स्थळ विकास योजनेंतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ४ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. जिल्ह्यातील ५२ मंदिरांचा पर्यटन दृष्ट्या कायापालट होणार आहे आणि या मंदिरांचे रुपडे बदलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मंदिरांचा विकास आणि कायापालट करण्यासाठी दरवर्षी जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण, संरक्षण भिंत उभारणे, पेव्हर ब्लॉक बसवणे भक्तनिवास बांधणे, पिण्याच्या पाण्याची योजना यासारखी कामे केली जातात. त्यानुसार २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील ५२ मंदिरांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी या कामांसाठी हा निधी मंजूर केला असून या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामपंचायत विभागाकडून करण्यात येत आहेत.

**तालुका निहाय कामांचा तपशील**

- कणकवली : गांगो मंदिर फोंडाघाट, (१५ लाख), गांगो- लिंग मंदिर, घोणसरी, (१५ लाख), गांगेश्वर मंदिर लोरे (१० लाख)
- देवगड : आरेश्वर मंदिर, आरे (२० लाख), हेदुलाई मंदिर, खुडी (२५ लाख), पावणाई मंदिर, किंजवडे (१० लाख).
- कुडाळ : भराडी मंदिर, वाडीवरवडे, (५ लाख), श्री स्वामी समर्थ मठ (६ लाख), सिद्ध महादेव मंदिर, केरवडे-नारुर (७ लाख), गिरोबा मंदिर, बिबवणे (३ लाख), सिमरा देवी मंदिर, रानबांबुळी (१५ लाख), श्रीकृष्ण मंदिर, सोनवडे (५ लाख), पावणाई मंदिर, मोरे, (५ लाख), देव कलेश्वर मंदिर, नेरूर (१० लाख), गिरोबा मंदिर, बिबवणे(५ लाख ), सातेरी मंदिर, अंजीवडे (५ लाख ), लक्ष्मीनारायण मंदिर, आवळेगाव(५ लाख), स्वयंभू मंदिर,पांग्रड(५ लाख), जटाशंकर मंदिर, केरवडे- नारूर(५ लाख), कलेश्वर मंदिर, नेरूर, (१५ लाख), गिरोबा मंदिर, भडगाव बुद्रुक(१ लाख ), रामेश्वर मंदिर, आकेरी, (५ लाख), लिंगेश्वर मंदिर, सोनवडे (५ लाख).
- मालवण : मिर्लेश्वर -भगवती मंदिर, बुधवळे, (१४ लाख), लिंगेश्वर मंदिर, गुरामनगरी (६ लाख), भगवती मंदिर, देवली, (५ लाख), गिरोबा मंदिर, नांदरुख (५ लाख), गांगेश्वर मंदिर आडवली (५ लाख), रामेश्वर -पावणाई मंदिर,असगणी, (४ लाख), लिंगेश्वर मंदिर, श्रावण (४ लाख), गांगेश्वर मंदिर, राठीवडे, (१५ लाख)
- सावंतवाडी : सातेरी -माऊली मंदिर, नेतर्डे (१५ लाख), पावणाई-रवळनाथ मंदीर पारपोली, (१० लाख) माऊली मंदिर, कवठणी, (७ लाख)भावई मंदिर, चौकुळ, (७ लाख), माऊली मंदिर, आंबोली, (१२ लाख)
- वेंगुर्ला : घोडेमुख, पेंडूर (१० लाख), सिद्धेश्वर मंदिर, म्हापण, (१० लाख)
- दोडामार्ग : सातेरी मंदिर, मणेरी (१५ लाख), हनुमान मंदिर, फुकेरी, (३१ लाख), माऊली मंदिर, मोरगाव, (७ लाख).

# खैर लाकडाची अवैध वाहतूक करणारा टेम्पो ताब्यात



■**वाडा। प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील मस्तान ते हालोली दरम्यान वनविभागाने केलेल्या कारवाईत सोलिव खैर लाकडाची अवैध वाहतूक करणारा टेम्पो फिल्मी स्टाईल पाठलाग करून पकडण्यात आला. या कारवाईत सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहनचालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वनविभागाला गुजरातकडून मुंबईच्या दिशेने खैर लाकडाची तस्करी करणारा टेम्पो जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार ४ एप्रिल रोजी जव्हार वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. सैपून शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी शरण देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी सावा, जव्हार तसेच पाली डेपो येथील वनपरिक्षेत्र अधिकार्यांच्या पथकाने महामार्गावर ठिकठिकाणी सापळा रचला.

मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास संशयित टेम्पो महामार्गावर दिसताच वन अधिकार्यांनी त्याचा पाठलाग केला. काही अंतरावर वाहन अडवून तपासणी केली असता टेम्पो सोलिव खैर लाकडाने भरलेला असल्याचे उघड झाले. वाहनातून सुमारे १५ घनमीटर खैर लाकूड आढळून आले. जप्त लाकडाची किंमत अंदाजे बाजारमूल्य १५ लाख रुपये असून वाहनाची किंमत सुमारे २० लाख रुपये असल्याने एकूण ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी टेम्पो चालक उमेशकुमार शुक्ला (उत्तर प्रदेश) याला वनविभागाने ताब्यात घेत गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. जप्त करण्यात आलेला खैर माल मुंबईहून चिपळूणकडे नेला जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

गेल्या वर्षभरात वनविभागाने २० ते २५ कारवाया करत कोट्यवधी रुपयांचा खैर, लाकूड वाहनांसह मुद्देमाल जप्त केला आहे. हा प्रकार संघटित गुन्हेगारीशी संबंधित असून यामध्ये मोठी आंतरराष्ट्रीय टोळी सक्रीय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# जमीन बळकावून अनधिकृत चाळी उभारणारा भूमाफिया अटकेत



■**विरार। प्रतिनिधी,**

वसई पूर्वेतील राजावळी परिसरात २१० गुंठे जमीन बळकावून त्यावर अनधिकृत चाळी उभारून खोल्या विक्री केल्याप्रकरणी भूमाफिया सुरेंद्र प्रताप सिंह ऊर्फ 'रंधा' याला गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने अटक केली आहे. वसई न्यायालयाने आरोपीला १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तक्रारदाराच्या मालकीची मौजे राजावळी येथील सर्व्हे क्रमांक १४६ (हिस्सा ३) व १४९ (हिस्सा २) मधील सुमारे २१० गुंठे जमीन आरोपीने २०२० ते २०२५ या कालावधीत बेकायदेशीररित्या ताब्यात घेतल्याचा आरोप आहे. या जमिनीचा कोणताही मोबदला न देता ती परस्पर विकासकांना विकण्यात आली. तसेच, संबंधित जागेवर अनधिकृत चाळी उभारून खोल्यांची विक्री करत अनेक सर्वसामान्यांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान, तक्रारदाराने जमिनीचे पैसे मागितले असता आरोपी रंधा आणि त्याचा साथीदार अरविंद अलगू सिंह ऊर्फ 'दारा' यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४), ३५२, ३५१ (२), ३५३ (३) व ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे सोमवारी रात्री मुख्य आरोपीला अटक केली. मंगळवारी त्याला वसई न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**आरोपींकडून बनावट स्वाक्षरीचे पत्र जप्त**

पोलिसांनी आरोपींकडून पंतप्रधानांच्या बनावट स्वाक्षरीचे फ्रेम केलेले पत्र, खेळण्यातील नोटांचे बंडल, दोन खऱ्या ५०० रुपयांच्या नोटा आणि दोन मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. याप्रकरणी वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी तो खंडणीविरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अरुण थोरात या प्रकरणाचा अधिक तपास करत असून या गुन्ह्यात अन्य आरोपींचा सहभाग आहे का, तसेच अशा प्रकारे अन्य कोणाची फसवणूक झाली आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

# पंतप्रधानांच्या बनावट पत्राद्वारे खंडणी उकळणाऱ्या दोघांना अटक




■**मुंबई। प्रतिनिधी,**

पंतप्रधानांच्या स्वाक्षरीचे बनावट पत्र दाखवून एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालिकेकडून ४ लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली आहे. तौसीफ हुसेन इस्माईल पटेल आणि सिद्धीनाथ दीनानाथ पांडे उर्फ सुनील अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून ते गोरेगाव येथील रहिवासी आहेत. आरोपींना एस्प्लनेड न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार महिला २०२० पासून 'मेगा श्रेया' नावाची समाजसेवी संस्था चालवतात. २०२२ मध्ये एका कार्यक्रमादरम्यान त्यांची ओळख जाहिरात क्षेत्रात काम करणाऱ्या तौसीफ पटेल आणि फर्नाझ वाडिया यांच्याशी झाली होती. १८ मार्चला पटेलने या महिलेला व्हॉट्सॲपवर व्हॉइस नोट पाठवून पंतप्रधान कार्यालयाकडून वाढदिवसाचे शुभेच्छा पत्र मिळवून देतो, असे आमिष दाखवले. सुरुवातीला हा दावा फोल वाटल्याने तक्रारदाराने त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, आरोपींनी हे पत्र खरे असल्याचे भासवून पीआर शुल्काच्या नावाखाली ४ लाख रुपयांची मागणी केली. २८ मार्चला फर्नाझ वाडियाने पंतप्रधान मोदी यांची स्वाक्षरी असलेले एक डिजिटल पत्र तक्रारदाराला पाठवले. या पत्रात त्यांच्या सामाजिक कायार्चे कौतुक करण्यात आले होते. संशय आल्याने तक्रारदाराने हे पत्र समाजमाध्यमावरून हटवले, तेव्हा आरोपींनी पैशांसाठी त्यांच्यावर दबाव वाढवला.

आरोपींनी तक्रारदाराच्या नावाने एक बनावट ई-मेल आयडी तयार करून हा पत्रव्यवहार खरा असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. २ एप्रिलला वरळी येथील एका कॅफेमध्ये झालेल्या भेटीत आरोपींनी पंतप्रधान कार्यालयात आमचे संबंध असल्याचे सांगून ४ लाख रुपये दिल्यास मूळ फ्रेम केलेले पत्र देण्याचे आश्वासन दिले. सततच्या धमक्यांमुळे तक्रारदाराने पोलिसांत धाव घेतली. खंडणीविरोधी पथकाने वरळी सी फेस येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून खंडणीची रक्कम स्वीकारताना दोन्ही आरोपींना रंगेहाथ पकडले.

# गरीब असल्याचे भासवायला सांगायचे अन् दागिने घेऊन फरार व्हायचे... तिघांना अटक



■**मुंबई। प्रतिनिधी,**

बोलबच्चन करून वयोवृद्धांचे सोन्याचे दागिने पळविणाया तिघांच्या टोळीला साकिनाका पोलिसांनी अटक केली आहे. संतोष गंगाराम चौरे, बालाजी रोहिदास पवार आणि लक्ष्मण रोहिदास पवार अशी या तिघांची नावे असून ते तिघेही अकोला आणि परभणीचे रहिवाशी आहेत. हे तिघेही अत्यंत चलाखीने ज्येष्ठ नागरिकांकडे जायचे आणि त्यांच्याशी गप्पागोष्टी करून त्यांना विश्वासात घेतल्यानंतर त्यांच्या अंगावरील दागिने काढून ठेवण्यास प्रवृत्त करत होते. मात्र या तिघांच्या अटकेने तेरा गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून सुमारे पंधरा लाखांचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत. अटकेनंतर त्यांना स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते.

साकिनाका येथे राहणाऱ्या 77 वर्षीय तक्रारदार महिला 24 मार्चला मच्छिमार्केट येथे गेल्या होत्या. त्यावेळी तीन अज्ञात व्यक्तींनी तक्रारदाराशी जुना परिचय असल्याचा आव आणला. तसेच तक्रारदाराला सांगितले की, त्यांच्या शेठला मुलगा झाला असून ते गरीबांना मोफत साडी देत आहेत. त्यामुळे जर तुम्हालाही ही मदत हवी असेल, तर तुम्हाला अत्यंत गरीब किंवा गरजू असल्याचे भासवावे लागेल. त्यामुळे तुम्ही तुमच्या अंगावरील सोन्याची साखळी आणि अंगठी काढून पिशवीत ठेवा, अन्यथा तुम्हाला ही मदत मिळणार नाही. वृद्ध पीडित महिलेने दागिने काढल्यानंतर आरोपींनी सोन्याचे दागिने आणि कॅश असा दोन लाखांचा मुद्देमाल घेऊन पलायन केले होते. याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल होताच साकिनाका पोलिसांनी पळून गेलेल्या आरोपींचा शोध सुरू केला होता.

सीसीटिव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीवरून डोंबिवली येथून संतोष चौरे याला पोलिसांनी अटक केली. त्याच्या चौकशीतून बालाजी आणि लक्ष्मण पवार या दोन बंधूंना शिर्डी येथून पोलिसांनी अटक केली. चौकशीत ते तिघेही बोलबच्चन करून फसवणूक करणाया टोळीतील सदस्य असल्याचे उघडकीस आले. चौकशीत संतोष चौरे हा अकोला येथे राहत असून मजुरीचे काम करतो. तो या गुन्ह्यातील तो मुख्य आरोपी असून त्याच्याविरुद्ध 26 गुन्हे दाखल आहेत. तसेच बालाजी आणि लक्ष्मण हे दोन्ही बंधू परभणीच्या गंगाखेडचे रहिवाशी असून सध्या कल्याण येथे राहतात. ते दोघेही बेरोजगार असून संतोष चौरे याच्योबत अशाच प्रकारचे गुन्हे करतात. यातील बालाजीविरुद्ध प्रत्येकी तीन गुन्ह्यांची नोंद आहे. ही टोळी रस्त्यावर जाणाया पादचार्यांना विशेषतः वयोवृद्धांना टार्गेट करून त्यांच्या शेठला मुलगा झाला आहे, साडी व रेशन वाटप सुरू आहे, असे बोलबच्चन देऊन त्यांची फसवणूक करतात. तिन्ही आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध मुंबई आणि नवी मुंबईत अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या अटकेने मुंबईसह नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यातील तेरा गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. या गुन्ह्यांतील 15 लाख 46 हजार 250 रुपयांचे 123 ग्रॅम वजनाचे विविध सोन्याचे दागिने मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

# नागपूरात पैशांसाठी १४ वर्षीय मित्राची निघृण हत्या




■**नागपूर। प्रतिनिधी,**

नागपूर शहरात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. शहराला हादरवून सोडणाऱ्या १४ वर्षीय मुलाच्या अपहरण आणि हत्या प्रकरणाचा उलगडा करण्यात नागपूर पोलिसांना यश आलं आहे. या प्रकरणात सोमवारी पहाटे गिट्टीखदान पोलिसांनी ३ आरोपींना अटक केली असून, या प्रकरणात पीडित मुलाच्या परिचित असलेल्या मित्रांनीच हा गुन्ह्या केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जयराम गोपाल यादव (१९, रा. गिट्टीखदान), केतन उर्फ कुणाल रमेश शाहू (२२, रा. गिट्टीखदान) आणि आयुष मोहन शाहू (१९, रा. मानकापूर) यांचा समावेश आहे. हे तिन्ही आरोपी भाजीपाल्याचा व्यवसाय करत असून, अथर्वच्या कुटुंबाशी त्यांची ओळख होती.

दरम्यान, अथर्व बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. यामध्ये एक संशयास्पद टाटा एस वाहन दिसून आल्याने या आधारे पोलिसांनी आयुष शाहूला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यानं संपूर्ण गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर इतर दोन्ही आरोपींनाही अटक करण्यात आली. गिट्टीखदान पोलीस आणि गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकानं ही कारवाई केली असून, सध्या या प्रकरणाबाबत आरोपींची अधिक चौकशी सुरू आहे.

**नेमकं काय घडलं?**

माहितीनुसार अथर्वच्या वडिलांचा भाजीपाल व्यवसाय असून त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात पैसे असल्याची माहिती आरोपींना होती. त्यानुसार त्यांनी ४० ते ५० लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा कट रचला. या अपहरणाची योजना ३ दिवसांपूर्वी आखण्यात आली होती. हनुमान जयंतीच्या दिवशी गिट्टीखदान परिसरात निघालेल्या शोभायात्रेदरम्यान अथर्व आईस्क्रीम घेण्यासाठी बाहेर पडला होता. त्यावेळी जयराम यादवनं त्याला बोलावून एका टाटा एस वाहनाजवळ नेलं, जिथे इतर दोन्ही आरोपी आधीच उपस्थित होते. तिघांनी मिळून अथर्वला जबरदस्तीनं गाडीत बसवलं आणि आवाज करू नये म्हणून त्याचं तोंड बांधलं. यानंतर आरोपींनी अथर्वला गोरेवाडा परिसरात नेलं. सुरुवातीला त्याला बेशुद्ध करून खंडणीसाठी ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र तो बेशुद्ध होत नसल्यानं आरोपींनी त्याला मारहाण केली. या मारहाणीमध्येच अथर्वचा मृत्यू झाला. यानंतर घाबरलेल्या आरोपींनी कापडानं गळा दाबून हत्या केल्याचंही समोर आलं आहे. या आरोपींनी हत्येनंतर पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. त्यांनी अथर्वचा मृतदेह कळमेश्वर रेल्वे क्रॉसिंग फ्लायओव्हरजवळ भरतवाडा परिसरात फेकून दिला आणि वापरलेली गाडी धुवून टाकली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com